**<u>अर्जदार साक्षीदार क्रं.१ यांचा उलटतपास गैरअर्जदार यांचे विधीज्ञ श्री. एस.आर थोरात याांचेमार्फत शपथेवर सुरू...</u>**

**२०.** सदरचे प्रकरणात मी एकुण ३ प्रतिज्ञालेख दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की तिन्हीही प्रतिज्ञालेखात मी माझे वय वेगवेगळे दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की मी पहिल्यांदा न्यायालयात साक्ष देत आहे. मी माझे प्रतिज्ञालेख वाचलेला आहे. मी स्वत: माझे प्रतिज्ञालेख तयार केले आहे. माझे आईवडिलांचे गाव अलेपिया केरळा आहे. हे म्हणणे खरे आहे की चावरा मॅट्रोमोनीयल साईटमध्ये मी माझे लोकेशन अलेपिया केरळा असे नमुद केले होते. हे म्हणणे खरे नाही की माझे मेट्रोमोनीयल प्रोपाईल मध्ये मला मुलगा पुणे किंवा मुबंई येथे काम करणारा व येथे राहणारा पाहिजे असे नमुद केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदारासोबत लग्न करण्यापुर्वी मी व माझे वडिलांनी गैरअर्जदार कुठे काम करित आहे याची पडताळणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की जेव्हा आम्ही सदरची पडताळणी केली होती त्यावेळेस गैरअर्जदार हा चेन्नई येथे काम करित होता व चेन्नई येथेच राहत होता. हे म्हणणे खरे नाही की माझे लग्नापुर्वी गैरअर्जदार हा चेन्नई येथे काम करित होता. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार हा लग्नापुर्वी चैन्नई येथे काम करित होता हे मी खोटे सांगत आहे. माझे लग्नापुर्वी गैरअर्जदार हा जयपुर, चैन्नई व कोचीन येथे काम करित होता याबद्दल मला माहिती नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगते की गैरअर्जदार लग्नापुर्वी इन्फोसीस पुणे व चैन्नई येथे काम करित होता याबद्दल मला माहिती होती.

**२१.** हे म्हणणे खरे आहे की मी आय.टी. सेक्टर मध्ये काम करित आहे. सध्याला मी आयशर टेस्ट या कंपनीमध्ये काम करित आहे.

**प्रश्न :** एखादा आय.टी. सेक्टरमध्ये काम करणारा माणुस त्याची कंपनी त्याचे स्वत:चे आर्थिक फायदयाकरिता बदलु शकतो.का?

**उत्तर** : ते त्या व्यक्तीवर निर्भय आहे.

२२.		हे म्हणणे खरे नाही की मी माझे सध्याचे उत्पन्न लपवित आहे त्यामुळे माझी सध्याची सॅलरी स्लिप मी दाखल केलेली नाही. माझी सॅलरी सध्याला माझे सीटी बॅंक खात्यात जमा होती व सध्याला ती एचडीएफसी बॅंकेत जमा होते. हे म्हणणे खरे नाही की मी माझे उत्पन्नाचे दाखल्यामध्ये सीटीबॅंक व एचडीएफसी बॅंकेचे खातेउतारे जोडलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की माझे चावरा मेट्रोमोनीयल साईड मध्ये मी मायक्रोसॉप्ट मध्ये काम करित आहे असे नमुद केले होते.

२३.		हे म्हणणे खरे नाही की माझे लग्नाचे पुर्वी गैरअर्जदार क्रं. १ चे वडिलांनी मला दि. १२.०१.२०१४ रोजी कधीच संपर्क केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. १ ने माझे वडिलांना कधीच खात्री दिली नाही की तो फक्त मुंबई किंवा पुणे मध्ये काम करेल. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. १ हा फक्त मुंबई किंवा पुणे येथे काम करेल असे लेखी आश्वासन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. १ याने पुणे किंवा मुंबई येथे काम करण्याचे आश्वासन दिले होते हे दर्शविणारे दस्त मी प्रकरणात दाखल केलेले नाहीत. गैरअर्जदार क्रं. १ चे आई, वडिल व बहिण हे नेमके कोणते तारीखला मला भेट दिली होती याबद्दल मी माझे प्रतिज्ञालेखात नमुद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. १ चे आई, वडिल व बहिण लग्नापुर्वी मला भेटण्याकरिता कधीच आले नव्हते त्यामुळे मी त्याबद्दलची तारीख व वेळ मी माझे प्रतिज्ञालेखात नमुद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझे प्रतिज्ञालेखात माझे साखरपुडयाची तारीख नमुद केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे वडिलांनी साखरपुडयाचा पुर्ण खर्च केला होता हे दर्शविणारा पुरावा मी प्रकरणात दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगते की खर्च केलेला काही पुरावे मी प्रकरणात दाखल केले आहेत. साखरपुडयाचे निमंत्रण पत्रिका आम्ही बनविले नव्हते त्यामुळे ते मी प्रकरणात दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की साखरपुडयाचे वेळेस माझे वडिलांनी गैरअर्जदाराला थांबविण्याकरिता शाही व्यवस्था केली होती. हे म्हणणे खरे नाही की साखरपुडयाचे वेळेस गैरअर्जदाराला ज्या हॉटेलमध्ये थांबविले होते त्याचे बिल मी प्रकरणात दाखल केलेले नाही.

**उलटतपास तहकुब.**

अर्जदार साक्षीदार क्रं. १ यांचा गैरअर्जदारातर्फे उलटतपास गैरअर्जदार यांचे तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.

—समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.07.15 17:44:09 +0530

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.07.15 17:44:12 +0530

( अल अमुदी ए.के. )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.
दि.१५.०७.२०२५

( अल अमुदी ए.के. )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पिंपरी, पुणे.

**– प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : श्रीमती किर्ती उदय पवार

न्यायालयाचे नांव : अल अमुदी ए . के., न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे.

न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक :१५/०७/२०२५

न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक :१५/०७/२०२५

पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक :१५/०७/२०२५

स्वाक्षरीत/–
लघुलेखक(श्रेणी–iii)